क्रमांक : ३२५६ / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : फेब्रुवारी, २०२५
27 FEB 2025

:: परिपत्रक ::

**विषय : महाराष्ट्र विधानसभेची तारांकित व अतारांकित प्रश्न सूचनांची उत्तरे QIS या संगणकीय प्रणालीद्वारे केवळ ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याबाबत**

महाराष्ट्र विधानसभेची तारांकित व अतारांकित प्रश्न सूचनांची उत्तरे सद्यःस्थितीत QIS (Question Information System) या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने तसेच छापील स्वरुपात प्रत्येकी ३ (तीन) प्रतींमध्ये स्वीकारण्यात येतात.

महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशन कालावधीमध्ये कामकाजाची अत्यंत तातडी असताना मंत्रालयीन विभागांकडून तारांकित व अतारांकित प्रश्न सूचनांची उत्तरे विहित कालावधीत प्राप्त न होणे, विभागाकडून प्रश्न सूचनांचे उत्तर QIS या संगणकीय प्रणालीद्वारे पाठविले जाणे, परंतु त्याची छापील प्रत अप्राप्त असणे, विभागाकडून ऑनलाईन पध्दतीने तसेच छापील स्वरुपात प्राप्त होणाऱ्या उत्तरांमध्ये तफावत आढळून येणे, परिणामी तारांकित व अतारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्यांच्या छपाईसाठी होणारा विलंब यांसह अनेक बाबी विचारात घेऊन अधिवेशनाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्याच्या दृष्टीने कागदविरहीत कार्यालय (पेपरलेस ऑफिस) ही संकल्पना प्रत्यक्ष अंमलात आणण्याकरिता तारांकित व अतारांकित प्रश्न सूचनांची उत्तरे दोन्ही स्वरुपात स्विकारण्याच्या कार्यपध्दतीचे पुनर्विलोकन करुन त्यामध्ये सुलभता आणणे आवश्यक असल्याने तारांकित व अतारांकित प्रश्न सूचनांची उत्तरे स्वीकारण्याच्या कार्यपध्दतीमध्ये बदल करून खालील निर्णय घेण्यात आला आहे:-

- महाराष्ट्र विधानसभेच्या नव्याने गठीत होणाऱ्या पंधराव्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात ऑनलाईन तसेच ऑफलाईन दोन्ही प्रकारे उत्तरे स्विकारण्यात येतील. तथापि, दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित व अतारांकित प्रश्न सूचनांची उत्तरे केवळ QIS (Question Information System) या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने मंत्रालयीन विभागाकडून स्वीकारण्यात येतील.
- मंत्रालयीन विभागांकडून QIS या संगणकीय प्रणालीद्वारे तारांकित व अतारांकित प्रश्न सूचनांचे या सचिवालयास पाठविलेले उत्तर हेच अंतिम उत्तर असल्याचे ग्राह्य धरण्यात येईल, तसेच याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाचीच राहील.
- मंत्रालयीन विभागांनी तारांकित प्रश्न सूचंनाची उत्तरे देण्याबाबतची तसेच प्रश्न सूचनेच्या हस्तांतरणाची कार्यवाही विहित कालावधीत करण्याकरिता या सचिवालयाकडून वेळोवेळी परिपत्रक निर्गमित करण्यात येते. सदर परिपत्रकामधील विहित दिनांकास तारांकित प्रश्न सूचनांची उत्तरे QIS या संगणकीय प्रणालीद्वारे देणे सर्व मंत्रालयीन विभागांना अनिवार्य आहे. तसेच विभागांकडून विहित मुदतीत उत्तर प्राप्त न झाल्यास तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्यांमध्ये उत्तरांच्या छापील प्रती टाकावयाची जबाबदारी संबंधित विभागाची असेल,

- मंत्रालयीन विभागांना अतारांकित स्वीकृत प्रश्न सूचनांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून म.वि.स. नियम ७२ (२) नुसार ३० दिवसांचा कालावधी देण्यात येतो. त्यानुसार विहित मुदतीतच अतारांकित प्रश्न सूचनांची उत्तरे QIS या संगणकीय ऑनलाईन प्रणालीद्वारे देण्यात यावीत.

आपली,

(मेघना तळेकर)
सह सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२) मा.प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
यांना माहितीसाठी तथा पुढील उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित
४) संगणक कक्ष व MKCL कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.